/

# विनंती अर्ज

दिनांक :- २५/०७/२०२३

प्रति,

मा. नोडल अधिकारी,
विभागीय अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प, जळगाव.

**विषय :-** जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पात काम करतांना मिळणाऱ्या मानधनातील तफावती बाबत..

**संदर्भ :-** १) T & M SERVICES CONSULTING PVT.LTD, MUMBAI मार्फत मिळालेले निवड आदेश पत्र Ref. No. TNM/MH/ID-३३१७८/ २०२२-२०२३ दिनांक ०४/०१/२०२३.

२) संगणक चालक पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात दिनांक ०६/०७/२०२२.

मी रुपेश प्रदिप भोळे विनंतीपुर्वक अर्ज सादर करतो की, माझी निवड उपरोक्त संदर्भ १ नुसार, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत संगणक चालक या पदाकरीता जिल्हा अंमलबजावणी कक्ष, जळगाव येथे झालेली आहे.

संगणक चालक पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये **रुपये २५०००/-**(अक्षरी रक्कम- पंचवीस हजार रुपये फक्त) मानधन/वेतन दर्शविण्यात आलेले होते व त्यामुळेच सदरील पदाकरिता मी अर्ज सादर केला होता.

वरील पदाकरिता जाहिराती मध्ये नमूद असलेले मानधन/वेतन व मला नियुक्ती पत्रामध्ये देण्यात आलेले मानधन/वेतन रक्कम रुपये **१५,९६६/-** (अक्षरी रक्कम- पंधरा हजार नऊशे सहासष्ठ रुपये फक्त) यामध्ये बरीच तफावत आहे. या पदाच्या कामाचे स्वरूप प्रकल्पातील सर्व जिल्हा अंमलबजावणी कक्षामध्ये एक सारखेच आहे. त्यामुळे मानधन/वेतन सर्व ठिकाणी एक सारखेच असायला हवे अशी माझी धारणा आहे.

D.I.U.(Smart),Jalgaon
Inward No: 279
Date: 25/07/2023

26-7

सध्याच्या महागाईचा दर लक्षात घेऊन व जळगाव सारख्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्यालयी कुंटुबासमवेत वास्तव्यास असल्याने मला जाहिरातील माझ्या पदाला मंजूर असलेले मानधन/वेतन मिळायला हवे. शासनाकडे झालेली सेवा लक्षात घेता तसेच माझ्या सारख्या पात्र व अनुभवी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचा उपजिविकेचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मनोबल वाढावे व मनाचे खच्चीकरण न होता माझ्या अर्जाचा सहानुतीपूर्वक विचार करून माझ्या पदाला स्मार्ट प्रकल्पात जाहीरातीमध्ये नमुद केलेले वेतन/मानधन मिळावे ही नम्र विनंती.

आपला विश्वासु

(रुपेश भोळे)
संगणक चालक,
जिल्हा अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प, जळगाव.

<u>प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर</u> :-

1) मा. प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
2) मा.वित्त विशेषज्ञ,प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
3) मा. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(कृषि), स्मार्ट प्रकल्प, पुणे.
4) मा. विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
5) मा. H.R., T & M Services Consulting Private Limited, Dahisar (East.) Mumbai - ४०००६८, (SMART).